# महाविद्यालये सुरु करण्याचा विचार

**मुंबई :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बंद असलेली राज्यातील महाविद्यालये २० जानेवारीपर्यंत ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा करून घेण्यात येईल, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.



सामंत यांनी फेसबुक पेजवरून विद्यार्थी, प्राचार्य, प्राध्यापक यांच्याशी संवाद साधताना प्राध्यापक भरती, महाविद्यालयांचे प्रश्न, प्रवेश प्रक्रियांमधील अडथळे तसेच इतर विषयांवर चर्चा केली. ते म्हणाले, ५० टक्के उपस्थितीत महाविद्यालये सुरु करण्यासाठी येत्या आठ दिवसात विद्यापीठातील वसतिगृहे, स्थानिक परिस्थिती यांचा आढावा घेण्यात येणार आहे. राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करुनच निर्णय घेतला जाणार आहे, असे सामंत यांनी सांगितले.

# दीक्षांत समारंभ; पदवी प्रमाणपत्रासाठी १३ जानेवारीपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ ५७ व्या दीक्षांत समारंभासाठी पदवी प्रमाण मागणीकरिता १३ जानेवारीपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस प्रारंभ होणार आहे. दीक्षांत समारंभासाठी ऑक्टोबर २०१९ व एप्रिल २०२० सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका, प्रमाणपत्र मिळविण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. १३ जानेवारी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरुवात होणार आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे. पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षांत अर्ज ३१ मार्चपर्यंत स्वीकारले जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जाची प्रिंट योग्य त्या कागदपत्रासह विभागात सादर करण्याची अंतिम तारीख १० मार्च आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अपुऱ्या अर्जांची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही. दीक्षांत समारंभाबाबतची माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

# ५० टक्के उपस्थितीत महाविद्यालये सुरु करण्याचा विचार : उदय सामंत

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

येत्या २० जानेवारीपर्यंत ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत राज्यातील विद्यापीठातील महाविद्यालये सुरू करण्याचा विचार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी दिली.

प्राध्यापक भरती, महाविद्यालयांचे प्रश्न, प्रवेश प्रक्रियांमधील अडथळे आदी विषयावर फेसबुक पेजवरून विद्यार्थी, प्राचार्य, प्राध्यापक यांच्याशी त्यांनी संवाद साधला. महाविद्यालये सुरू करण्याबाबत येत्या २० जानेवारीच्या आत निर्णय घेतला जाईल, असे उदय सामंत यांनी सांगितले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महाविद्यालये सुरू करता येतील का किंवा त्यासाठी काही नियमावली तयारी करावी याचा विचार केला जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

महाविद्यालये सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांच्या मनात चिंता असणे स्वाभाविक आहे. मात्र या सगळ्याचा विचार करून आणि खबरदारी घेऊनच महाविद्यालये आणि इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्याचा निर्णय भविष्यात घेण्यात येईल, असे आश्वासन उदय सामंत यांनी दिले. लॉ कॉलेजच्या ऑनलाईन प्रवेशप्रक्रियेत तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आहे. त्यासाठी लॉ महाविद्यालयाच्या प्रवेशप्रक्रियेची मुदत येत्या सोमवारी आणि मंगळवारी दोन दिवस वाढवण्यात आली असल्याचे सामंत यांनी सांगितले. पॉलिटेक्निक विभागाच्या प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढवण्याची मागणीही केली जात होती. त्यानुसार १५ तारखेपर्यंत पॉलिटेक्निक आणि तंत्र विभागाच्या सगळ्या प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढवण्यात येणार आहे. परंतु १५ तारखेची ही वाढीव मुदत अंतिम असणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## प्राचार्यांची २६० पदे भरणार

राज्यातील प्राध्यापक आणि प्राचार्यांच्या भरती प्रक्रियेविषयी देखील उदय सामंत यांनी घोषणा केली आहे. त्यानुसार प्राचार्यांची २६० पदे भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विद्यापीठातील ४९ संविधानिक पदे भरण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. कोरोनाच्या पाश्वभूमीवर अर्थमंत्रालयाने काढलेल्या परिपत्रकानंतर प्राध्यापकांची भरती रोखण्यात आली होती.

# महाविद्यालयेही होणार सुरू

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री सामंत यांचे सूतोवाच

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ९ : राज्यातील नववी ते बारावीचे वर्ग नोव्हेंबरपासून सुरू झाल्यावर आता महाविद्यालयेही लवकरच सुरू करण्याचे सूतोवाच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज फेसबुक लाइव्हद्वारे केले. राज्यातील परिस्थितीचा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आढावा घेऊन विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या ५० टक्के उपस्थितीत सुरू करण्याविषयीचा निर्णय २० जानेवारीपर्यंत घेण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.

### महत्त्वाचे निर्णय

- प्राचार्यांची २६०, तर ४९ संवैधानिक पदे भरण्याचा निर्णय
- प्रत्येक जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र
- विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यास ११ व १२ जानेवारीपर्यंत वाढीव मुदत.
- तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासही १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- मुक्त विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही सातवा वेतन आयोग लागू.